# जवान

नदीतीरावर एका शहीद जवानाच्या दशक्रिया विधी सुरु होता. ब्राम्हण बुवांनी भाताचे पिंड बनवून त्याची विधीवत पूजा केली.

ब्राम्हण बुवांच्या सांगण्यानुसार घरातल्या सर्व सदस्यांनी, जवानाच्या आई-वडिलांनी, भाऊ-बहिणींनी पाणाव-लेल्या डोळ्यांनी दर्शन घेतले. जवानाची गर्भवती पत्नी मात्र दर्शन घेण्याच्या मनःस्थितीत नव्हती. लग्नाला अवघे सहा महिने झाले होते, त्यांना एकमेकांचा पुरेसा सहवास देखिल लाभला नव्हता. तोच नियतीने त्यांची ताटातूट केली. तिचा फोडलेला हंबरडा बघून उपस्थितांचे देखील कंठ दाटून आले होते.

पिंडदान करून बराच वेळ झाला तरी कावळा मात्र पिंडाजवळ फिरकला नव्हता. शेवटी जवानाची पत्नी हिंमत करुन पिंडाजवळ गेली आणि दर्शन घेऊन म्हणाली, "आपल्या बाळाला देखील मी सैन्यात भरती करणार." तत्क्षणी कावळा येऊन पिंडाला शिवला.



सौ. माधवी पंकज हौडे,
गकुर्ली, ठाणे.